# इंदिरा ते निर्भया

शहरभर सर्वत्र नवरात्र उत्सवाची सांगता होत होती. स्त्री शक्तीचे प्रतिक मानल्या जाणाऱ्या दुर्गादेवीच्या मूर्ती विसर्जनाच्या मिरवणुका ठिकठिकाणी निघाल्या होत्या. खुप गर्दी झाल्याने रस्त्यावरील रहदारीचा वेग एकदम संथ झाला होता. मोठमोठ्या आवाजात वाजविले जाणारे गाणे, त्याच्या तालावर बेधुंदपणे नाचणारी तरुणाई असे चित्र रस्तावर होते. गर्दीतून हळूहळू वाट काढत जाणाऱ्या दुचाकीस्वार तरुणीच्या अंगाला स्पर्श करणारा त्याच गर्दीतला एक भक्त (!) आणि तो 'नकोसा स्पर्श' पुसून टाकायचा प्रयत्न करत पुढे निघालेली ती तरुणी.. स्त्री ही देवीचे रूप आहे असे ऐकले कि कित्येक वर्षापूर्वी नजरेसमोर घडलेला प्रसंग आठवत राहतो.

स्त्री म्हणजे देवीचे रूप, 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' अशा घासून गुळगुळीत झालेल्या सुभाषितानी आपणच आपल्या संस्कृतीचे गुणगान करत असताना 'निर्भया' सारखे प्रकरण स्त्रियांची सामाजिक स्थिती काय आहे यावर नव्याने प्रश्न निर्माण करते. कल्पना चावलाच्या अवकाश भरारीचे कौतूक वाचताना मन आनंदित होऊन उडायला लागते त्याच वेळेला त्याच वर्तमानपत्राच्या दुसऱ्या कोपऱ्यात सामुहिक बलात्काराची एखादी बातमी धपकन जमिनीवर आणून आपटते. भारताचे स्वातंत्र्य कुमारअवस्थेत असताना जवळपास १६ वर्षांची पंतप्रधानपदाची कारकीर्द उपभोगलेल्या इंदिरा गांधीचा गुणगौरव केला जातो त्याच देशात इंदिरा नावाच्या अनेक स्त्रिया बलात्कार आणि त्यानंतर पुढे येणाऱ्या संघर्षाला तोंड देत असतात. ही विसंगती का? इंदिरा ते निर्भया हा भारतीय समाजाचा प्रवास त्या दोघीही स्त्रिया आहेत म्हणून महत्वाचा आहे कि प्रगतीच्या वाटेकडे जाणाऱ्या अतिशय वेगळ्या वाटेच्या प्रवाशी आहेत म्हणून महत्वाचा.

या निबंधात मी इंदिरा गांधी ते स्त्री वर्गाचा सामान्य घटक असणारी निर्भया यांची स्त्री म्हणून सामाजिक स्थिती याचा उहापोह करणार आहे.

**<u>भारतीय स्त्रियांचे समाजातील स्थान- इतिहास</u>**

इंदिरा ते निर्भया हा स्त्रीजीवनाचा प्रवास पाहताना जरा इतिहासाकडे वळून पाहणे संयुक्तिक ठरेल. वैदिक काळात मैत्रेयी, गार्गी सारख्या विदुषींची उदाहरणे जरी पाहायला मिळत असली तरी इतिहासात डोकवले तर भारतीय स्त्रियाचे सामाजिक स्थान गौण होते हे मान्य करावेच लागेल. आजदेखील पौराणिक कथांचा दाखला देतांना 'एका सीतेमुळे रामायण घडले' किंवा ' महाभारत घडण्यास द्रौपदी कारणीभूत होती' असे म्हणताना रावणाचे कपट किंवा कौरवांची कूटनीती असे अनेक घटक समाजाकडून सहजपणे दुर्लक्षिले जातात. द्रौपदी म्हणजे पांडवांचा मान, तिच्या कपडे फेडणे म्हणजे पांडवांचा पुरेपूर बदला घेणे ही मानसिकता फार पूर्वीपासून समाजात आहे हे प्रतीत होते.

नंतरच्या काळात वेळोवेळी होणाऱ्या परकीय आक्रमणात स्त्रियांवर अत्याचार होऊ लागले. स्त्रियांचे रक्षण करणे महत्वाचे ठरु लागले. पण त्याचबरोबर स्त्रियांच्या कक्षा अरुंद होत गेल्या. स्त्रियांवर होणारे अत्याचारावर उपाय शोधताना त्या मात्र अनेक अनिष्ट प्रथांच्या जाळ्यात अडकत गेल्या. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांच्या सहाय्याने समाजसुधारकांनी सती, बालविवाह सारख्या प्रथांवर बंदी आणली. सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांनी कष्ट सोसत शिक्षणाची वाट खुली करून दिली. स्त्रियांचा स्वातंत्र्याच्या दिशेने प्रवास सुरु झाला. अनेक स्त्रिया शिकू लागल्या. शिक्षणाने आलेले शहाणपण त्या विधायक कामासाठी वापरू लागल्या. भारत स्वतंत्र झाल्यानंतर

काही काळातच इंदिरा गांधी देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या. स्त्रिया अनेक क्षेत्रात फक्त सहभागीच झाल्या असे नाही तर यशस्वी देखील झाल्या. हा यशाचा आलेख परिपूर्ण आहे असे वाटत असतानाच कानावर पडणाऱ्या, वाचायला मिळणाऱ्या बलात्कार, अश्लील असभ्य वर्तन, विनयभंग, गर्भातच मुलींची होणारी हत्या, जातीबाहेर लग्न केले तर होणारी हत्या, हुंड्यासाठी होणारा छळ अशा असंख्य गुन्ह्याची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली.

१६ डिसेंबर २०१२ रोजी निर्भया बलात्कार घडलं तेव्हा स्त्रियांचे भारतातील समाजजीवनात स्थान यावर परत प्रश्न निर्माण झाला. स्त्रियांची उत्तरोत्तर प्रगती होत आहे तो केवळ आभास आहे का? हा प्रश्न देखील या निम्मिताने निर्माण झाला. निर्भायामुळे स्त्रियांचे आधुनिक युगातील समाजात स्थान काय याची नव्याने चर्चा सुरु झाली.

**<u>निर्भयाचा बळी - नवीन समस्या कि जुनाच प्रश्न पुन्हा नव्याने?</u>**

बलात्काराच्या घटना जेव्हा जेव्हा घडतात तेव्हा दोन प्रकारचे गट दिसतात. एक गट जो पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव, तंत्रज्ञानाच्या उपयोगाचे दुष्परिणाम, मुलींचे कपडे, मुलींचे स्वातंत्र्य यावर टीका करत सुटतो. या गटात मोडणारे आणि समाजाचे नेतृत्व करणारे राजकारणी, अध्यात्मिक गुरु वेळोवेळी मुक्ताफळे ऐकवतात. नवी दिल्लीत ७१ वर्षाच्या ननवर झालेला बलात्कार, काठेवाडीतील सगळ्या वयोगटातील बायकांवर झालेला बलात्कार (त्यात तरुणीपासून अगदी ७० वर्षाच्या वृद्धेचा समावेश होता), काही महिन्यांच्या मुलींपासून म्हाताऱ्या स्त्रियांवर होणारे बलात्कार हे वरती दिलेल्या कारणापलीकडे आहेत.

तर दुसरा गट जो समाजात खोलवर रुजलेल्या पुरुषसत्ताक संस्कृतीकडे बोट दाखवतो. त्याकडे दुर्लक्ष न करता त्याच्या मुलाशी जाणे गरजेचे आहे.

निर्भायाच्या रूपाने बलात्काराच्या समस्येवर परत लक्ष केंद्रित करायला लावणारी ही समस्या भारतीय समाजाला नवीन नाही. स्त्रियांचे समाजातील दुय्यम स्थान, तिच्यातील योनिशुचीतेच्या भोवती फिरणाऱ्या प्रतिष्ठेच्या कल्पना अनेक प्रश्न निर्माण करतात. बलात्काराची समस्या आज 'आ' वासून भारतीय स्त्रियांचा बळी घेऊ पाहत आहे. भारताच्या पवित्रतेबद्दल, अध्यात्मिकतेबद्दल ओढ असणारे परदेशी स्त्रिया देखील यात अडकताहेत. बलात्काराची समस्या हे भारतात खोलवर रुजलेल्या मानसिकतेचे दुष्चक्र आहे. एका गोष्टीचा दुसऱ्याशी संबंध नाही असे मानता मानता अनंत प्रश्न समोर उभे राहतात. त्यातले काही प्रश्न खालीलप्रमाणे आहे.

१. गर्भात मारल्या जाणाऱ्या नकोशा मुली

'म्हातारपणाची काठी' समजल्या जाणाऱ्या मुलांचा हव्यास भारतीय समाजाला नवीन नाही. एका मुलासाठी अनेक मुलीना जन्म देनाचा प्रघात अनेक वर्ष सुरु होता. पण नंतर काळ बदलला. नवीन तंत्रज्ञान आले. गर्भामध्ये काही दोष असतील ते कळावे यासाठी वापरण्यात येणारे तंत्रज्ञान गर्भाचे लिंग जाणून घेण्यासाठी वापरण्यात यायला लागले आणि नकोशा मुलीचे जग गर्भातच संपू लागले. मुलगी म्हणजे ओझे, ते वेळीच बाजूला केले पाहिजे अशी भावना यातून जन्माला येते.

कायद्याने लिंगनिदान चाचणीवर बंदी घातल्यावर लपून छपून अशा चाचण्या होऊ लागल्या. पैशासाठी आपल्या व्यवसायाशी दगा करत चाचणी करणारे डॉक्टरदेखील गल्लोगल्ली सापडू लागले. आज १०००

मुलांच्या मागे मुलींची संख्या ९१७ पर्यंत रोडावली आहे. भविष्यात अजून संकटं येऊ घालणार आहेत याची ही नांदी आहे.

२. बाल विवाह

मुलगी झाली तरी तिची जबाबदारी लवकर तिच्या मालकीच्या(!) लोकांकडे सोपवावी यातून बाल विवाहाची प्रथा सुरु झाली. कुमारवयात आपली मुलगी आई बनायला नको त्यामुळे तिचे लवकर लग्न लावून मोकळे होण्याचा विचार यामागे असे. बाल विवाह कायद्याने संमत नसला तरी अजूनही भारतात अनेक ठिकाणी बाल विवाह होतात ही वस्तुस्थिती आहे. यातून अनेक गुंतागुंती घडत असतात. प्रतिष्ठेला धक्का लागण्याच्या भयापायी वयाने अजाण असणाऱ्या मुलांना नव्या प्रश्नाच्या गर्तेत ढकलण्यात येते.

राजस्थानात १९९२ साली गावात होणाऱ्या बालविवाहास विरोध केल्याचा सूड उगविण्यासाठी समाजसेविका भंवरीदेवी वर सामुहिक बलात्कार करण्यात आला होता. सरकारसाठी काम करत असणाऱ्या भंवरीदेवीला न्यायासाठी अनेक काळ झगडावे लागले.

३. बाल लैंगिक अत्याचार

लहान मुलांवर होणारा हा बलात्कारच.. फक्त कायद्याच्या तांत्रिक व्याखेत बसत नसल्यामुळे त्याला बलात्कार न म्हणता लैंगिक अत्याचार म्हणण्यात येते. निर्भया प्रकरणानंतर सितारवादक अनुष्का शंकर हिने लहानपणी लैंगिक अत्याचार झाल्याची माहिती दिली. बलात्काराच्या घटना घडल्यावर मुलीनी कसे कपडे घालावे, कसे वागावे याचे सल्ले देणाऱ्या लोकांनी ज्या लहान मुलांवर लैंगिक अत्याचार होत आहे त्यांचे वय लक्षात घ्यायला हवे. जगाची नीटशी ओळख झाली नसताना त्यांचे भावविश्व उध्वस्त करणारे लोकं बरेचदा मोकाट फिरत असतात. लहान मुलं आपल्या विरोधात फार बोलू शकणार नाही हे जाणून सुरु असलेल्या अशा घटनांना आळा घालण्यासाठी सतर्क राहण्याची गरज आहे. बंगलोर मधील 'संवाद' नावाच्या समाजसेवी संस्थेने १९९४ साली ३८४ मुलीच्या केलेल्या सर्वेक्षणात ८३ टक्के मुलीनी बाल लैंगिक अत्याचार सहन केल्याचे नोंदवले.

४. हुंडाबळी आणि संबधित अत्याचार

एकेकाळी स्त्रीला तिच्या माहेरच्या संपत्तीत हक्क मिळत नसे तेव्हापासून सुरु झालेली ही प्रथा अजूनही सुरूच आहे. अनेक समाजामध्ये मोठ्या प्रमाणात द्याव्या लागणाऱ्या हुंड्यामुळे मुलीचा जन्म दुखद मानतात. लग्नात आणलेला हुंडा आणि त्यायोगे स्त्रीला मिळणारी वागणूक ही मोठी समस्या आहे.

काही समाजात तर योग्य हुंडा घेऊन न आलेली स्त्री घरातील सगळ्याच्या सर्व गरजा भागविण्यासाठी वापरली जाते. इथेदेखील इभ्रतीसाठी पोलिसांकडे जाण्याचे धाडस दाखविले जात नाही.

५. कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण

स्त्री शिकायला लागली तरीदेखील तिला योग्य ते स्थान समाजात मिळत नाही. अजूनही ती उपभोगायची वस्तू आहे असेच बघितल्या जाते. स्त्रियांचे नोकरी करण्याचे वाढलेले प्रमाण आहे त्याच प्रमाणात त्यांना कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषणाला देखीर सामोरे जावे लागते.

याशिवाय रस्त्यावर होणारी छेडछाड ही देखील गंभीर समस्या आहे.

एखादी स्त्री राजकारणात सर्वोच्च पदी पोहोचली असली तरी त्यामुळे देशातील सर्वसामान्य स्त्रियांची स्थिती बदलली असे झाले नाही. याउलट इंदिरा गांधी यांचा उल्लेखदेखील 'द ओन्ली मॅन इन हर कॅबिनेट' असा होत असे. एक स्त्री म्हणून असलेल्या तिच्यातील गुणांचा ही एकप्रकारे अहवेलनाच होती. 'आमची मुलगी आम्हाला मुलासारखीच आहे', 'ती आमची मुलासारखीच काळजी घेते' अशी वाक्य आपल्याला सतत स्त्रीच्या अस्तित्वाचा आणि स्थानाचा विचार करायला लावतात.

**<u>निर्भायांकडे बघण्याचा सामाजिक दृष्टीकोन</u>**

जिच्यावर बलात्कार झाला आहे तिच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन चेहरा झाकलेली, गुडघ्यात डोके खुपसलेली, घाबरलेली, अंधारात बसलेली अशीच प्रतिमा छापून येते. बलात्कार झाला म्हणजे स्त्रीची प्रतिमा मलीन झाली, आयुष्याचे संचित लुटल्या गेलं या मानसिकतेतून समाजाने त्या व्यक्तीला मदत करायला हवी. बलात्कार झाला म्हणून जगणे संपले किंवा कुठे तोंड दाखवायला जागा राहिली नाही या मानसिकतेतून समाजाने बाहेर पडायला हवे. स्त्री म्हणजे घराची इज्जत, तिला काही झाले तर सगळ्या घराची इज्जत गेली हे जेव्हा संपेल तेव्हा बरेच प्रश्न सुटायला लागतील. लेसी उदविनच्या 'इंडियाज डॉटर' या डॉक्यूमेंटरी मध्ये निर्भया बलात्कार प्रकरणातील आरोपी म्हणतो कि तिला धडा शिकवायला आम्ही बलात्कार केला. तीने आम्हाला विरोध केला नसता तर आम्ही काही केले नसते. केवळ धडा शिकवण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या बलात्काराची यादी लांबलचक आहे. गावात होणाऱ्या बालविवाहास विरोध करणारी भवरीदेवी, चोरीस विरोध केला म्हणून बलात्कार करण्यात आलेली सौम्या किंवा प्रेमास नकार दिला म्हणून होणारे अॅसिड हल्ले..द्रौपदीच्या काळापासून चाललेले हे सत्र तथाकथित आधुनिक युगात देखील थांबत नाहीय. स्त्रीवर बलात्कार केला म्हणजे तिची प्रतिष्ठा धुळीस मिळाली हा समज जोवर टिकून आहे तोवर बलात्कार घडत राहणार. हे एक दुष्टचक्र आहे. हे थांबायची सुरुवात 'नकोशी' चा गर्भ खुडताना विचार करायला हवं अथवा अशी नाव ठेवताना करायला हवा.

निर्भाया प्रकरणावर आधारित 'इंडियाज डॉटर' या डॉक्यूमेंटरीमध्ये 'आमच्या समाजात स्त्रियांना स्थान नाही', स्त्रीने समाजात कसे वागले पाहिजे' याचे वर्णन करणाऱ्या वकीलाचे व्यक्तव्य अनेकांना खेदात टाकणारे आहे. समाजाच्या शिकल्या घटकाने तरी असा विचार करू नये ही माफक अपेक्षा लोकांकडून व्यक्त होत होती. पण वकील काय, राजकारणी काय किंवा अजून इतर लोकं देखील याच समाजाचा घटक आहेत. त्यांची मानसिकता देखील समाजात राहून बनलेली आहेत. त्यामुळे त्यांच्या वक्तव्यांकडे दुर्लक्ष न करता गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. या मानसिकतेला बदलण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

**<u>कायद्यातील त्रुटी</u>**

अजूनही अनेक केसेस फक्त चार भिंतीमागे दबलेल्या हुंद्क्याच्या रूपाने उरतात. बलात्कारासारख्या शरीराचे आणि मनाचे खच्चीकरण करणाऱ्या घटनांना चार भिंतींच्या बाहेर जायची परवानगी देखील मिळत नाही. अशा अनेक न सांगितल्या गेलेल्या कहाण्यामध्ये कितीतरी निर्भया दिसू शकतील. सामाजिक कारणांशिवाय कायद्यातील त्रुटी आणि पोलिसांची अनास्था हे देखील केस पोलिसांकडे दाखल न करण्याकडे कल आहे.

लोकसंखेच्या प्रमाणात पोलीस आणि न्यायाधीशांची पुरेशी संख्या नसणे आणि त्यामुळे न्याय मिळण्यास विलंब होण्याचे प्रमाण देखील अधिक आहे. 'तरुणपणी बलात्कार झालेल्या मुलीला म्हातारपणी न्याय मिळतो' अशा आशयाची कविता न्यायव्यवस्थेविषयी बरेच काही बोलून जाते. निर्भया केस नंतर बलात्काराच्या केसेस हाताळण्यासाठी फास्ट ट्रक कोर्टाची स्थापना करण्यात आली आहे. निदान यामुळे तरी न्याय लवकर मिळण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे.

कायद्याने 'बलात्काराची' ठरविलेली व्याख्या अनेकदा त्रोटक ठरते. स्त्रियांशी संबंधित अनेक कायद्यांमध्ये वेळोवेळी सुधारणा करायला हव्यात. कॉमनवेल्थ ह्यूमन राईट्स इनिशिएटीव्ह (सीएचआरआय) तर्फे बलात्काराच्या घटनांवर जो अहवाल सदर करण्यात आला त्यानुसार बहरतात दर अर्ध्या तासाला एक बलात्कार होतो. समजा तुम्ही ३ तासाचा चित्रपट पाहायला गेलात तेवढ्या वेळात ६ स्त्रियांवर बलात्कार झालेला असेल. असा विचार धक्कादायक वाटत असतानाच या घटना रोखण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ भारतात उपलब्ध नाही ही दुर्दैवी बाब आहे. बलात्कार झाल्यानंतर ठराविक वेळेत टेस्ट्स न झाल्यामुळे मोकाट सुटणाऱ्या गुन्हेगारांची संख्या देखील लक्षणीय आहे.

**<u>निर्भया - शेवट कि परिवर्तनाची सुरुवात?</u>**

एक शेतकरी होता. त्याच्या शेतातील जमीन एकदम सुपीक होती. तो त्या जमिनीत चांगले पिक उगवायचे स्वप्नं पाहत असे. त्याकरिता तो मेहनत घेत असे. पिकं जसजसे वाढू लागे तसतसे शेतात तण देखील उगवत असे. चांगल्या बहरू पाहणाऱ्या पिकात तण बघितले कि शेतकरी ते तण कापून फेकत असे. तण झटपट कापून झाले कि शेतकरी खूष होत असे. त्याचा थोडा काळ सुखात जाई पण पुन्हा काही दिवसात नवीन तण हजर. त्याचा वैताग रस्त्याने जाणारा साधू बघत असे. एकदा साधू त्याच्याजवळ थांबून म्हणाला, 'तण कापून टाकण्यापेक्षा मुळासकट उपटून फेक आणि परिणाम बघ'. शेतकऱ्याने साधूचा सल्ला ऐकायचे ठरविले. शेतकऱ्याला नेहमीपेक्षा जास्त कष्ट पडले. वेळही खुप लागला, प्रचंड घाम गाळावा लागला. पण तण आधीच्या जोमाने फोफावले नाही.

बलात्कारासारख्या घटना रोखायच्या असतील तर कराटे प्रशिक्षण, केवळ महिलांसाठी टॅक्सी सुविधा असे तण कापणारे उपाय करण्यापेक्षा प्रश्नाच्या मुळाशी जाऊन ते समूळ नष्ट करण्यावर भर दिला पाहिजे. त्यासाठी कुठल्याही साधूच्या सल्ल्याची गरज नाही.

तसेच प्रगतीच्या संकुचित, खुळ्या कल्पनेतून स्त्रियांनीदेखील बाहेर पडले पाहिजे. जो काही बदल करायचा, जी काही मानसिकता बदलायची ती पुरुषांनी बदलावी आणि स्त्रियांनी आपल्या स्त्रीपणाचे, नाजूकतेचे हवे तसे भांडवल करावे असे नाही. आज केवळ सवंग प्रसिद्धीच्या हव्यासापोटी स्वतःची आणि पर्यायाने समस्त स्त्री वर्गाची पत खाली आणणाऱ्या अनेकांना वेळीच लगाम घालायला हवा. त्याकरिता फुले, कर्वे यांनी घेतलेल्या कष्टांची जाण सगळ्यांनी ठेवायला हवी.

कुठल्या संस्थेच्या आकडेवारीनुसार भारताचा नंबर जगात कितवा लागतो? आपल्या देशातील ही समस्या जेवढी दाखविल्या जाते तेवढी गंभीर नाही, असे मानण्याने आपण आल्याच पायावर धोंडा मारून घेत आहोत. समस्या आहे आणि त्याचे निराकरण करणारे उपाय प्रामाणिकपणे शोधायचे ठरविल्यास 'इंदिरा ते निर्भया' ऐवजी 'इंदिरा

ते सायना' असा स्त्रियांच्या प्रगतीचा आलेख दर्शविणारे निबंध लिहिता येतील. आणि खऱ्या अर्थाने स्त्रीची प्रगतीच्या दिशेने वाटचाल होईल.

-शिल्पा गडमडे

फ्रांकफुर्ट, जर्मनी